# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४


**विषय - पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा** इयत्ता - ११ वी व १२ वी

* 'पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा' हा विषय कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम व सर्व द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अनिवार्य असून ह्या विषयाची गुण विभागणी वार्षिक पद्धतीने करण्यात यावी.

  **प्रकल्प कार्यासाठी - ३० गुण**

  **जर्नल / सेमिनार कार्य - २० गुण**

  **एकूण = ५० गुण**

* प्राप्त गुणाचे A,B,C,D या श्रेणीत रूपांतर करण्यात येईल, D श्रेणी अनुत्तीर्ण दर्शवेल.
* इयत्ता ११वी-१२वी पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयासाठी अंतर्गत व बाह्य परीक्षकांकडून मूल्यमापन करण्यात येईल.
* इयत्ता ११वी साठी संबंधित महाविद्यालयातीलच शिक्षक बाह्य व अंतर्गत परीक्षक म्हणून काम पाहतील व त्यांची नेमणूक महाविद्यालय स्तरावर होईल. इयत्ता १२वी साठी मूल्यमापन पद्धतीत बाह्य परीक्षकांची नियुक्ती मंडळाकडून करण्यात येईल.
* अंतर्गत परीक्षक व बाह्य परीक्षक यांच्या एकत्रित परीक्षणातून विद्यार्थ्यांना ५० पैकी मिळालेल्या गुणांचे श्रेणीत रूपांतर करून विद्यार्थ्याचा वार्षिक निकाल जाहीर करण्यात येईल.
* विद्यार्थ्यांना इयत्ता १२वी च्या पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयात ५० पैकी मिळालेल्या गुणाचे श्रेणीत रूपांतर करून मिळालेली श्रेणी मंडळाकडे अधिकृत श्रेणीतक्त्यात सादर करावेत.
  या विषयाची लेखी परीक्षा नसली तरी प्रकल्प कार्य व सेमिनार/जर्नल कार्य यांमध्ये ५० पैकी मिळालेल्या गुणांचे श्रेणी रूपांतर करून, मिळालेली श्रेणी गुणपत्रिकेत दर्शवण्यात येईल.
* इयत्ता ११वी-१२वी मध्ये उत्तीर्ण होण्यासाठी 'पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा' या विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.
* पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विषयाची लेखी परीक्षा नसल्यामुळे या विषयाच्या बाबतीत पुनर्मूल्यांकन होणार नाही.
* पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विषयास सवलतीचे गुण देय असणार नाहीत.
  विद्यार्थी पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयात एकदा उत्तीर्ण झाल्यास, त्यास श्रेणी वाढीसाठी पुन्हा प्रविष्ठ व्हायचे असल्यास, त्यास प्रकल्प, जर्नल/सेमीनार कार्य पुनश्च नव्याने करावे लागेल.
* इयत्ता १२वीच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प कार्य अहवाल व जर्नल/सेमीनार कार्य हे बोर्डाकडून दिलेल्या प्रकल्प व जर्नल कार्यवहीतच पूर्ण करावेत/ लिहावेत.

**महत्त्वाचे :**

* इ. ११वी–१२वी साठी प्रत्येक तुकडीसाठी आठवड्यातून दोन तासिका, पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयासाठी देण्यात आलेल्या आहेत. त्या नियमित वेळापत्रकात प्राध्यान्याने दर्शवून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. संबंधित तासिकेमध्ये पर्यावरण व जलसुरक्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करावा व त्यावर आधारित प्रकल्प कार्य आणि सेमिनार/जर्नल कार्य शिक्षकांनी वर्षभरात विद्यार्थ्याकडून तसेच प्रत्येक पाठातील उपक्रम (Activity) पूर्ण करून घ्यावेत.
* मूक–बधीर, अंध व अपंग विद्यार्थ्यांना सेमिनार/जर्नल यापैकी जे करणे सोयीस्कर होईल ते करून घेणे, यासाठी संस्थेच्या व विद्यार्थ्याच्या सोयीनुसार शिक्षकाने वरील विद्यार्थ्यांबाबत मुख्याध्यापक/प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली तो निर्णय घ्यावा.

  तसेच बाह्य विद्यार्थ्यांना सेमिनार/जर्नल यापैकी जे जे करणे सोपे होईल ते करून घेणे.

**अध्यापन पद्धती**

* शिक्षकांनी सेमिनार किंवा जर्नल कार्य या दोन्हीपैकी एक पद्धत कार्यासाठी वापरावी.

  कार्यपुस्तिकेमध्ये पाच सेमिनार व पाच जर्नल कार्य प्रत्येक पाठातील एक असे घ्यावे. जेणेकरून पाठ्यपुस्तकातील घटकांना न्याय मिळेल.

  सेमिनार उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण (नेतृत्व, वक्तृत्व व भाषा इ. क्षमता) विकास होण्याची संधी प्राप्त होते. तर जर्नल कार्यामुळे विश्लेषण आणि लेखन/मांडणी कौशल्य, समग्र, दृष्टीकोन व्यापक होण्यास मदत होते.
* विद्यार्थी संख्येमुळे सेमिनारला दिला जाणारा वेळ व उपलब्ध वेळ यांचा मेळ बसत नसल्यास काही विद्यार्थ्यांना जर्नल कार्य उपक्रम देता येईल. याचे संपूर्ण स्वातंत्र्य शिक्षकांना राहील. विद्यार्थ्यांसाठी उपक्रम/ कार्य निवडताना त्याची क्षमता व आवड यानुसार निर्णय घ्यावा.
* विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या प्रत्येक पाठातील एका घटकावर असे एकूण पाच सेमीनार अहवाल द्यावेत किंवा इयत्ता ११वी–१२वी साठी पाठ्यपुस्तकातून स्वतंत्रपणे प्रत्येक पाठातील एक असे एकूण पाच जर्नल कार्य पूर्ण करावीत. परंतु प्रत्येक जर्नल कार्य हे वेगवेगळ्या पाच पाठांतील असावे.
* विद्यार्थ्याचे वय, समज यानुसार त्यांनी एखाद्या घटकावर तयारी करून सादरीकरण करावे.

  सादरीकरणासाठी मौखिक तयारीप्रमाणेच तक्ते, चित्रे, प्रतिमाने (models) स्लाईडस्, संगणक आधारित कार्यक्रम (powerpoint presentation) अशी विविध साधने वापरावीत व सादरीकरण अधिक नेटके, वळणदार तसेच परिणामकारक करणे अपेक्षित आहे.

* प्रकल्प कार्य व सेमिनार किंवा जर्नल कार्यासाठी गुणदान योजना खालील प्रमाणे (संदर्भ तक्ता-१) राहील.

**तक्ता - १**

**प्रकल्प कार्य व जर्नल कार्य / सेमिनार कार्य पुनर्रचित गुणदान योजना पुढीलप्रमाणे राहील.**

| अंतर्गत कार्य | अंतर्गत परीक्षक | बाह्य परीक्षक | एकूण गुण |
|---|---|---|---|
| प्रकल्प कार्य | २० | १० | ३० |
| जर्नल/सेमिनार कार्य | १० | १० | २० |
| **एकूण** | **३०** | **२०** | **५०** |

**प्रकल्प कार्य : - ३० गुण**

पर्यावरण प्रकल्प कार्य अहवाल लेखनासाठी खालील मार्गदर्शक सूचनेनुसार करावा.

प्रकल्प कार्य अहवाल सादरीकरण विद्यार्थ्यांनी खालील मुद्द्यांना अनुसरून लेखन करणे अनिवार्य आहे. पाठ्यपुस्तकात प्रकल्प कार्यासाठी दिलेल्या संदर्भ प्रकल्प यादीतून किंवा यादीबाहेरील पर्यावरणसंबंधी समस्या विषय घेऊन प्रकल्प कार्य करावे.

प्रकल्प कार्याचे मूल्यमापन खालील मुद्द्याप्रमाणे असेल.

**१) प्रकल्प विषय निवड (प्रस्तावना) :**

प्रस्तावनेमध्ये निवडलेल्या प्रकल्पाविषयी थोडक्यात माहिती लिहिणे अपेक्षित आहे,

जसे - विद्यार्थ्यांनी पर्यावरणासंबंधी समस्या, विषयाची निवड का केली, संकल्पना, थोडक्यात विषयाचा इतिहास, नवीन अद्ययावत माहिती, विषयाची सद्यस्थिती अशा घटकांचा समावेश प्रस्तावनेमध्ये प्रामुख्याने असावा.

**२) विषयाचे महत्त्व :**

यामध्ये सध्याच्या परिस्थितीत प्रकल्पाचे पर्यावरणविषयी, शास्त्रीय तसेच सामाजिक मूल्याचे महत्त्व ओळखून त्याबाबत नेमकेपणाने लिहावे.

**३) प्रकल्प कार्याची उद्दिष्ट्ये :**

ज्या हेतूने आपण प्रकल्पाचा विषय निवडला, त्या अनुषंगाने प्रकल्प कार्याची योग्य उद्दिष्ट्ये लिहिणे आवश्यक आहे.

**४) प्रकल्प कार्यपद्धती :**

प्रकल्प कार्यपद्धतीमध्ये माहिती संकलन करण्याच्या विविध संशोधन अभ्यासपद्धतीचा वापर करता येतो. जसे - सर्वेक्षण, प्रश्नावली, मुलाखत, प्रयोग, क्षेत्र निरीक्षणे, क्षेत्रभेट इत्यादी पद्धतीचा अवलंब करावा. पर्यावरणाचा प्रकल्प हा साधारणत: विद्यार्थ्यांच्या स्थानिक परिस्थितीला अनुसरून असला पाहिजे. (परंतु यापुरतेच मर्यादित नाही) सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक पातळीवरील पर्यावरणाच्या समस्यांचा विचार करण्यास प्रवृत्त करावे. जेणेकरून त्यांना सभोवतालच्या समस्यांचा विचार करण्याची त्यावरील उपाय योजण्याची व पर्याय शोधण्याची संधी प्राप्त होऊ शकते.

**५) निरीक्षणे :**

निवडलेल्या कार्यपद्धतीने प्राप्त माहिती ही निरीक्षणे, आलेख तक्त्याच्या स्वरूपात प्रदर्शित करावी, तसेच संक्षिप्त व मुद्देसूद असावीत. निरीक्षणावरच पुढचे निष्कर्ष अवलंबून असणे जरुरीचे आहे.

६) **विश्लेषण :**

अंकीय किंवा सांख्यिकीय आधारे आपण संकलित केलेल्या निरीक्षणांच्या आधारे विश्लेषण करणे हा महत्त्वाचा टप्पा आहे. मध्य, मध्यमान, सहसंबंध, सरासरी, टक्केवारी इत्यादीच्या आधारे विश्लेषण अधिक अचूक व प्रभावी होते. सदर पद्धतीने आपण आलेख, स्तंभालेख, पायआलेख, अशा आकृतींच्या माध्यमातून माहिती आपण प्रभावीपणे दर्शवू शकतो.

७) **निष्कर्ष :**

विश्लेषणावरून प्राप्त माहितीच्या आधारे प्रकल्पाचा निष्कर्ष लिहावा.

* प्रकल्प कार्यामुळे विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती, चिकित्सक विचार क्षमता व्यापक बनण्यास मदत होते. पाठ्यपुस्तकात प्रकल्प कार्यासाठी उदाहरणादाखल काही प्रकल्प विषयाची यादी दिलेली आहे. त्या यादीतील तत्सम/स्थानिक परिस्थिती व पर्यावरणीय तसेच शाश्वत विकासाच्याबाबत समस्यावर आधारीत असे विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून निश्चित करावेत. विषय निवडीची मूभा ही विद्यार्थ्यांना असावी. तसेच विषय निवड करताना विषयाची पुनरावृत्ती टाळावी. गट प्रकल्प विषय घेता येतील परंतु गटातील प्रत्येक विद्यार्थी स्वत:ची कार्यपद्धती व अभ्यासक्षेत्र निवडून, सक्रियतेने प्रकल्प कार्य, पूर्ण करतोय याकडे शिक्षकाचे लक्ष असणे आवश्यक आहे. तसेच अशा वेळी शिक्षकांनी वस्तुनिष्ठ व नि:पक्षपातीपणे गुणदान करावे. सदर प्रकल्प विद्यार्थ्यांच्या स्वहस्ताक्षरात असावे.

  सदर प्रकल्प अहवाल हा ८-१० पानी (पाठ-पोट) (Back to Back) असावा. यास अनावश्यक सजावट करून नये व प्लास्टिकचे कव्हर वापरू नये.
* प्रकल्प अहवालामध्ये अनावश्यक फोटो, चित्र, चिटकवू नये. प्रकल्प कार्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्षभर मार्गदर्शन करावे.

**प्रकल्प कार्य गुणदान विभागणी तक्ता - २**

| अंतर्गत परीक्षकांचे मूल्यमापन | गुण | बाह्य परीक्षक मूल्यमापन | गुण |
|---|---|---|---|
| १) प्रकल्प विषय प्रस्तावना – | २ | प्रकल्प अहवाल सादरीकरण | ५ |
| २) विषयाचे महत्त्व – | २ | | |
| ३) प्रकल्प कार्य उद्दिष्ट्ये – | २ | | |
| ४) प्रकल्प कार्यपद्धती – | ४ | | |
| ५) निरीक्षणे – | ४ | तोंडी परीक्षा | ५ |
| ६) विश्लेषण – | ४ | | |
| ७) निष्कर्ष – | २ | | |
| एकूण – | २० | | १० |

**जर्नल / सेमीनार कार्य – २० गुण**

१) शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठातील एक असे एकूण – ५ जर्नल / सेमीनार कार्य तयार करावे.
२) जर्नल कार्य हे पाठ्यपुस्तकातील घटक व उपक्रम / कृतीवर आधारित उपयोजनात्मक प्रश्न तयार करावे.
३) इ. ११ वीसाठी ५ जर्नल/सेमीनार कार्य हे वार्षिक परीक्षेवेळी परीक्षा वेळापत्रात घड्याळी १ तास ३० मिनिटे वेळ देऊन एकाच वेळी पूर्ण करून घ्यावे.
४) इ. १२ वी साठी ५ जर्नल/सेमीनार कार्य हे डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत शाळा, माहाविद्यालयात स्वतंत्र वेळापत्रक तयार करून घड्याळी १ तास ३० मिनिटे वेळ देवून एकाच वेळी पूर्ण करून घ्यावे.
५) यामध्ये बहिस्थ : परीक्षक १० गुण व अंतर्गत परीक्षक १० गुण असे एकूण २० पैकी गुण देण्यात येतील.
६) जर्नल/सेमिनार कार्यासाठी प्रत्येकी ४ गुण असतील. (अंतर्गत व बहिस्थ परीक्षक)

## जर्नल कार्य तक्ता – ३

| अंतर्गत परीक्षकांचे मुल्यमापन | गुण | बाह्यपरीक्षकाचे मुल्यमापन | गुण |
|---|---|---|---|
| जर्नल मांडणी<br>(विद्यार्थ्यांची समज किंवा उपयोजन मांडणी, शाश्वत विकास संकल्पनेचे आकलन)<br>व<br>कार्यपूर्ती<br>(५ जर्नल कार्य पूर्ण करणे) | १० | जर्नल कार्यपूर्ती विषयाचे आकलन लेखन<br>व<br>तोंडी परीक्षा | १० |
| **एकुण – २०** | | | |

**किंवा**

**सेमीनार**

**मुख्य विषय :**
**उपघटक :**
**सादरीकरण**
निवडलेला विषय विद्यार्थ्यांच्या स्थानिक पर्यावरणीय समस्येशी निगडीत आहे का व कसा?

## सेमीनार तक्ता – ४

| अंतर्गत परीक्षकांचे मुल्यमापन | गुण | बाह्यपरीक्षकाचे मुल्यमापन | गुण |
|---|---|---|---|
| विषय निवडी मागील प्रेरणा<br>व<br>अहवाल लेखन<br>(५ सेमिनार कार्य पूर्ण करणे) | १० | सेमीनार सादरीकरण | १० |
| **एकूण गुण – २०** | | | |

**सेमिनार दर्जेदार असण्यासाठीचे निकष :**

१) मुख्य विषय व उपघटक

२) निवडलेला विषय पाठ्यपुस्तिकेतील असावा.

३) निवडलेल्या बहिस्थ परिक्षकाने विद्यार्थ्यांनी स्वत: सादर केलेल्या सेमिनार विषयावरील आधारीत प्रश्न विचारावेत.

४) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने त्यांनी सेमिनार द्यावे अशी अपेक्षा आहे.

५) विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकामधील लिहिलेल्या ५ सेमिनार पैकी एका सेमिनारवर तयारी करून अभ्यासपूर्ण सादरीकरण करावे.

६) सादरीकरण हे मौखिक तयारी प्रमाणेच / त्याखेरीज तक्ते, चित्रे, प्रतिमान (Model), स्लाईड्स, संगणकाधारित कार्यक्रम (Power Point Presentations) अशी विविध साधने वापरावीत व सादरीकरण अधिक नेटके व परिणामकारक करावे.

## विद्यार्थ्यांसाठी

१) विद्यार्थ्यांनी प्रत्येक पाठातील एक असे, एकूण ५ जर्नल किंवा सेमिनार कार्य पुर्ण करणे आवश्यक आहे.

२) जर्नल सेमीनार कार्याचे/ लेखन दर्जेदार असावे.

३) विद्यार्थ्यांची समज, विषयाचे आकलन, उपयोजन, मांडणी, शाश्वत विकास संकल्पनेचे आकलन उदाहरणांचा वापर इत्यादी निकष ठेवून विद्यार्थ्यांच्या लेखनाच्या दर्जानुसार गुणदान होईल.

४) विद्यार्थ्यांनी प्रकल्प कार्य अहवाल मार्गदर्शक सुचनेनुसार दिलेल्या प्रकल्प कार्य वहीतच लिहावे.

५) जर्नल/सेमीनार कार्य अहवाल लेखन प्रत्येकी किमान एक पान (One Side) लिहावे.

## पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयाच्या मुल्यमापनात
## बाह्य परीक्षकांची भूमिका

**१) प्रकल्प कार्य व सेमिनार / जर्नल कार्याचे मुल्यमापन (तपासणी आणि तोंडी परीक्षा) करणे**
**२) संबंधित विभागीय मंडळात बाह्यपरीक्षणाचे अंतिम गुणपत्रक / श्रेणीपत्रक संबंधित केद्रांवर सादर करणे.**

## प्रकल्प कार्य व सेमिनार / जर्नल कार्याचे मुल्यमापन
## (तपासणी आणि तोंडी परीक्षा करण्यासाठी सूचना)

**प्रकल्प कार्य :**

**प्रकल्प कार्याचे मुल्यमापन खालील मुद्यांवर आधारीत असावे.**

**१) प्रकल्प लेखन :**

अ) प्रकल्प अहवालाच्या अनुषंगाने सर्व टप्प्यांचा समावेश केला आहे का ?

आ) प्रत्येक टप्प्यांत आवश्यक दर्जेदार माहितीचा समावेश केला आहे का ?

**२) तोंडी परीक्षा – विद्यार्थ्यांनी पुर्ण केलेल्या प्रकल्प कार्यावर आधारीत प्रश्न विचारावेत**

**उदा.**

अ) संबंधित विषयच प्रकल्पासाठी का निवडला ?

आ) संबंधित प्रकल्प विषयाच्या अभ्यासातून मिळालेल्या माहितीची सांगड दैनंदिन जीवनाशी कशी कराल?

इ) संबंधित प्रकल्पाची अभ्यास पद्धती कोणती?

ई) प्रकल्पाची निरीक्षणे किंवा निष्कर्ष सांगा.

उ) समाजातील एक जागरूक नागरिक म्हणून पर्यावरण जनजागृतीसाठी तुमची भूमिका काय?

ऊ) तुम्ही या प्रकल्पाच्या अभ्यांसातून समाजाची जनजागृती कशी कराल?

ए) हा प्रकल्प अभ्यासताना तुम्हाला आलेला अनुभव सांगा.

ऐ) नैसर्गिक साधन-संपत्तीच्या वापराविषयी आपली भूमिका स्पष्ट करा.

**सेमीनार कार्य :–**

१) सेमिनार अहवालाचे मुल्यमापन खालील मुद्यांवर आधारित असावे.

अ) विद्यार्थ्यांनी स्वत: सादर केलेल्या सेमिनारचे प्रत्येक पाठातील एक असे एकूण पाच लिखीत अहवाल पूर्ण केलेले आहेत का ?

आ) लिखीत अहवाल दर्जेदार असणेसाठीचे निकष

क) मुख्य विषय

ख) निवडलेला विषय विद्यार्थ्यांच्या स्थानिक पर्यावरणीय समस्येशी निगडीत आहे का व कसा ?

२) सेमिनार विषय आधारित सादरीकरण

**किंवा**

**जर्नल कार्य :–**

१) जर्नल कार्य अहवालाचे मूल्यमापन खालील मुद्यांवर आधारीत असावे.

अ) विद्यार्थ्यांनी प्रत्येक पाठातील एक असे ५ जर्नल कार्य पुर्ण केलेल आहेत का ?

आ) जर्नल कार्याचे लेखन दर्जेदार आहे का ?

२) तोंडी परीक्षा – विद्यार्थ्यांनी पुर्ण केलेल्या पाच जर्नल कार्यावर आधारीत प्रश्न विचारावेत.

**टीप :–**

१) बाह्य परीक्षकाने विद्यार्थ्याने प्रकल्प कार्य व सेमिनार/जर्नलकार्य तपासणी आणि तोंडी परीक्षा यासाठी प्रती विद्यार्थी किमान ५–७ मिनिटे वेळ द्यावा.

२) विभागीय मंडळात बाह्य परीक्षणाचे अंतिम गुणपत्रक /श्रेणी पत्रक सादर करण्यासाठी संबंधित केंद्रांवर जमा करणे

३) बाह्य परीक्षकांनी प्रकल्प अहवाल व सेमिनार / जर्नल अहवाल प्रमाणपत्रांवर दिनांकसहित सही करून गुणदान तक्यात गुणदान करावे.

४) तोंडी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे गट करताना व प्रती दिवस किती गट (बॅच) असावे, हे कनिष्ठ महाविद्यालयाने निश्चित करावे.

५) सदर बाब निश्चित करताना प्रत्येक विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा कमीत कमी ५ मिनिटे घेण्यात यावी हा निकष पाळावा.

*** तोंडी परीक्षेसंदर्भात अंतर्गत परीक्षकांनी करावयाची कार्यवाही**

१) नियुक्त अंतर्गत परीक्षकांनी प्रकल्प अहवाल व सेमिनार / जर्नल कार्य अहवाल तपासून गुणदान तक्त्यातच गुणदान करावे.

२) प्रकल्प कार्य व सेमिनार अहवाल/जर्नल कार्य हे मंडाळाच्या निकषाप्रमाणे आहे याची पाहणी करून नि:पक्षपातीपणे गुणदान करावे.

३) गुणपत्रिकेत गुण / श्रेणी स्पष्ट व सुवाच्च अंकात व अक्षरात नोंदवावे.

४) गुणांची / श्रेणींची नोंद इंग्रजी अंकात व अक्षरात नोंदवावी.

५) गुण / श्रेणी नोंदविताना खाडाखोड, ओव्हर-रायटींग करू नये. तसेच अनावधानाने झाल्यास तेथे संक्षिप्त स्वाक्षरी करावी. व्हाईटनरचा वापर करू नये.

६) एखादा विद्यार्थी बहि:स्थ तोंडी परीक्षेत उपस्थित नसल्यास त्याला फक्त अंतर्गत परीक्षकाने दिलेले गुण व त्यांची श्रेणी मंडळाच्या अधिकृत गुणपत्रिकेमध्ये देण्यात यावे.

७) प्रत्येक शैक्षणिक वर्षात मुल्यमापन केलेले प्रकल्प अहवाल व सेमिनार / जर्नलकार्यवही मुल्यमापन तक्ता डिसेंबर अखेरपर्यंत कनिष्ठ महाविद्यालयातच जतन करून ठेवावे. दरम्यानच्या काळात बोर्डाकडून त्याची तपासणी केली जाईल.

८) महाविद्यालय स्तरावर गुण विभागणी तक्ते तसेच अंतर्गत व बाह्य परीक्षक यांनी केलेल्या परीक्षणाचे गुण नोंदवणासाठी सोबतच्या मुल्यमापन तक्ता तयार करावा. (तक्ता-५ प्रमाणे)

९) पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विषयासंदर्भातील सर्व रेकॉर्डसोबतच्या तक्त्यानुसार त्यावर शैक्षणिक वर्षाचा उल्लेख केलेला असावा.

१०) इ. १२वीच्या मंडळाच्या (तक्ता-५ प्रमाणे) अंतिम लेखी परीक्षेपूर्वी पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विषयाचे मुल्यमापन पूर्ण करून अंतिम गुण / श्रेणी विभागीय मंडळाकडे पाठवावे. तरी याबाबत सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घेवून संबंधिताच्या निदर्शनास आणून देऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयाचे मूल्यमापन आराखडा तक्ता – ५ खालीलप्रमाणे करावा.**

College Index No. - Academic Year - College Name -

| Sr. No. | Roll No. | Exam. Seat Number | Internal Examiner | | | External Examiner | | | Total A+B | Marks convert to Grade |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Project work | Seminar/ Journal Work | Total A | Project Work | Seminar/ Journal Work | Total B | | |
| | | | 20 | 10 | 30 | 10 | 10 | 20 | 50 | A,B,C,D |
| | | | | | | | | | | |

**प्रकल्प कार्य अहवाल व जर्नल / सेमिनार कार्य अहवाल मी स्वत: तपासले/पाहिले असून ते बरोबर आहेत.**

Name and Signature
Internal Examiner

Date :

Name and Signature
External Examiner

Date :

**खालील प्रमाणे दिलेल्या गुणांचे श्रेणीत रूपांतर करावे**

**श्रेणी तक्ता**

| **गुण**/Marks | **श्रेणी**/Grade |
|---|---|
| ३० – ५० | A |
| २३ – २९ | B |
| १८ – २२ | C |
| ० – १७ | D |

**टीप : सदर परिपत्रक मंडळाच्या** mahahssboard.maharashtra.gov.in **या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.**